MHBU140009602023

## <u>निशाणी क्र. १९ वरील आदेश</u>

अर्जदाराने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५३ व आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्तीसाठी करण्यास परवानगी मिळणेबाबत केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे की, अर्जदार यांनी त्यांचे चुलत आजोबा नामे तुरेबाजखॉ रहेमानखॉ यांचे नांवे मु. जानेफळ ता. मेहकर व लाखनवाडा ता. खामगांव व ता. बाळापुर अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील अचल संपत्तीचे कामी वारस दाखल मिळणेसाठी वरील नमुद अर्ज प्रकरण दाखल केलेला असून सदर अर्ज प्रकरणात वेळोवेळी मयत तुरेबाजखॉ रहेमानखॉ यांचे नावाचा व मुख्यत्वे करुन त्यांच्याच अचल संपत्तीच्या कामी त्यांचे मृत्युपश्चात त्यांच्या नावे असलेल्या अचल संपत्तीला वारसांची नावे लावणेसाठी मुख्य अर्ज प्रकरणात नमुद करण्यात आलेले आहे.

३. तसेच बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम (viii) २ चे अर्जातील पॅरा क्र. ३ मध्ये अर्जदाराचे मयत चुलत आजोबा नामे तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण यांचे नावे गांव अकोली ता. खामगांव जि. बुलढाणा येथील गट क्रमांक व उपविभाग ६१ व मौजे अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गट क्रमांक उपविभाग २३३ या अचल संपत्तीचे स्पेसिफिक कथन नमुद करणे नजरचुकीने व अनावधानाने करण्याचे राहुन गेलेले आहे. परंतु, सदर वारस प्रमाण पत्राचे अंतिम आदेशा नंतर कोर्ट फी आकारणी मोघम स्वरुपात करता येणार नाही. त्याकरीता अचल संपत्तीचे स्पेसिफिक कथन करणे गरजेचे व अत्यावश्यक आहे. सबब बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम (viii) २ चे अर्जातील पॅरा क्र. ३ खाली नवीन पॅरा क्र. ३ ब टाकुन त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

४. नीवन पॅरा क्र. ३ ब अर्जदारांचे मयत आजोबा नामे तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण यांचे नावे गांव अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गट क्रमांक व उपविभाग ६१, व मौजे अकोली, ता. खामगांव जि. बुलडाण येथील गट क्रमांक व उपविभाग २३३ अशा प्रकारे दोन अचल संपत्ती असुन त्या दोन्ही अचल संपत्यांचे गांव नमुना सात बाराचे उतारे सदर अर्जाचे रेकॉर्डवर दाखल केलेले आहे.

**५.** तसेच बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम (viii) २ चे अर्जातील पॅरा क्र. १० ब मध्ये सुरुवातीच्या पहिल्या ओळीत नजरचुकीने अनावधनाने तसेच टायपोग्राफीकल मिस्टेकने मयत या मजकुरापुढे तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण असे नाव लिहिण्याचे राहून गेलेले असुन दुस—या ओळीत त्यांचे मृत्यूप्रश्चात अर्जदार क्र. १ व २ यांच्या नांवे या मजकुरापुढे त्यांचे मयत चुलत आजोबा तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण यांचे नांवे गांव अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गट क्र. व उपविभाग ६१ व मौजे अकोली, ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गट क्रमांक व उपविभाग २३३ या असा स्पेसिफिक मजकुर लिहिण्याचे राहून गेलेले असल्याने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम (viii) २ चे अर्जातील पॅरा क्र. १० ब खाली नवीन उपपॅरा इ टाकुन त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**६.** नविन पॅरा क्र. १० इ मयत तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण मयत सायराबी सैयद धुमाळ व मयत हाफिजाबी हबीब खान यांचे मृत्यू प्श्चात अर्जदार क्र. १ व २ यांचे नांवे त्यांचे मयत चुलत आजोबा तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण यांचे नावे गांव अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गट क्र. व उपविभाग ६१ व मौजे अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गटक्रमांक व उपविभाग २३३ या अचल संपत्तीला अर्जदाराची नांवे कायदेशीर वारस म्हणुन लावणेसाठी व शासकीय व निमशासकीय कामांसाठी व इतर सामान्य कामांसाठी वारस दाखला देण्याचा हुकूम व्हावा.

**७.** अर्जदारांनी अर्ज दाखल करतांनाच पॅरा क्र. ३ मध्ये त्यांचे मयत चुलत आजोबा तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण यांची अकोली येथील अचल संपत्तीचा उल्लेख केलेला आहे. मात्र नमूद केलेल्या मजकुरावरुन स्पेसिफिक कोर्ट फी स्टॅम्प ड्युटी आकाराणी करता येणार नाही. सबब अर्जदारांनी दाखल केलेल्या वारस प्रमाण पत्राच्या अंतिम आदेशाच्या वेळी कोर्ट फी स्टॅम्प ड्युटीस घेउन कोणताही नवीन वादमुद्दा उपस्थित होउ नये व पारदर्शीपणे अंतिम आदेश होण्यासाठी पॅरा क्र. ३ खाली नवीन पॅरा क्र. ३ ब टाकुन दुरुस्ती सुचविली आहे. तसेच पॅरा क्र. १० ब मध्ये मयत असे टाईप करुन त्यापुढे तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण हे नाव लिहिण्याचे नजरचुकीने राहुन गेले व पुन्हा मयत असे लिहुन सायराबी सैयद धुमाळ यांचे नाव लिहिण्यात आले सबब दोन वेळी मयत मयत असे लिहिले गेले. सबब नविन पॅरा क्र. १० इ मध्ये मयत तुरेबाजखॉ रहेमानखॉ पठाण यांचे नाव लिहिल्याने व नविन पॅरा क्र. ३ ब च्या दुरुस्ती प्रमाणे अचल

संपत्ती स्पेसिफिकपणे पॅरा क्र. १० इ मध्ये नमुद केल्याने सदरच्या तांत्रिक स्वरुपाच्या दुरुस्तीने सदर अर्जाचे स्वरुपात कोणताही मुलभूत स्वरुपाचा बदल होत नाही अगर अर्जाचे स्वरुप बदलत नाही. सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

८. याउलट हरकतदारा तर्फे विधिज्ञ यांनी सदरच्या अर्जाला सक्त विरोध दर्शविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, सदर दुरुस्ती ही कायदेशीर नाही. वारसा प्रमाणपत्रामध्ये दुरुस्ती अर्जाची आवश्यकता नसते. अर्जदाराची आई नामे नशीमबी गफ्फार खान यांना यापूर्वीच वारसाप्रमाणपत्र मिळाले आहे. मौजे अकोली ता. खामगांव जि. बुलडाणा येथील गट क्र. ६१ मधील ०१ हे. ५० आर जमिनी संदर्भात दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, खामगांव यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक ४७२४ हा दाखल केलेला आहे. सदर दाव्यासोबत आदेश ३९ रुल १,२ व कलम १५१ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे तातपुरत्या मनाई हुकूमाकरीता अर्ज वादीने केला आहे. सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

९. खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे —

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारामधील वादाचे निराकरण होणेसाठी महत्वाचे आहे का ? | होकारार्थी |
| २. | आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा.

**मुद्दा क्रमांक १ व २**

**१०.** अर्जदारांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराचे कथन असे की, त्याला अर्ज कलम ३ नंतर ३ब, कलम १० नंतर १०ब, अर्ज कलम १०इ समाविष्ट करणे आहे. सदर दुरूस्ती करण्यास परवानगी दिली तर अर्जाचे स्वरूपात बदल होणार नाही अगर हरकतदारांच्या हक्कावर कोणताही परिणाम होणार नाही. सबब, प्रस्तावित दुरूस्ती ही दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी महत्वाची दिसून येते. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी दिले आहे. सबब खालील आदेश करण्यात येते आहे.

**अमानुल्ला हबीब खान व इतर वि. नील**
**वारसा प्रमाणपत्र.क्र. ६६/२०२३**

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा नि.क्र. १९ वरील अर्ज १००/— रू. खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने सदर दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करुन घ्यावी.

स्वा/—
(श्रीमती पी.एम. कांबळे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, मेहकर.

दि. १५/०१/२०२६